महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र. मरासाप्रप(सीईटी)क/कृशिप्र-१३२६/प्र.क्र. ०३/जा.सू. क्र. ०१/केंप्रप्र/नोटीस/१६४१ दिनांक : १०/०७/२०२६

## जाहीर सूचना क्र. ०१

## शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेबाबत.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता कृषी शिक्षण विभागांतर्गत कृषी व कृषी संलग्न व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

सदर प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज नोंदणी (Online Application Form) व आवश्यक कागदपत्रे अपलोड करण्याची प्रक्रिया **शुक्रवार, दि. १०/०७/२०२६** पासून प्रारंभ करण्यात येत आहे.

एमएचटी-सीईटी २०२६ तसेच संबंधित अभ्यासक्रमांसाठी विहित इतर राष्ट्रीय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण/पात्र असलेल्या उमेदवारांनी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या www.mahacet.org या संकेतस्थळावरील संबंधित लिंकद्वारे विहित मुदतीत ऑनलाईन नोंदणी करून अर्ज सादर करावा. अर्जासोबत आवश्यक कागदपत्रे व प्रमाणपत्रे स्कॅन करून अपलोड करणे बंधनकारक राहील.

कृषी अभियांत्रिकी विद्याशाखा वगळता इतर सर्व विद्याशाखेच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश पात्रतेमध्ये MHT-CET / JEE याबरोबरच NEET सामायिक प्रवेश परीक्षेचा समावेश आहे. तथापि, NEET सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल अद्याप जाहीर झालेला नाही. मात्र पदवी प्रवेश प्रक्रिया वेळेत सुरु करणेही गरजेचे असल्याने पदवी प्रवेश प्रक्रियेचे सन २०२६-२७ साठीचे तात्पुरते वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | कार्यवाही | दिनांक |
|---|---|---|
| १ | प्रवेश प्रक्रियेस सुरुवात दिनांक | १०/०७/२०२६ |
| २ | केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबत आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे अपलोड संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | २५/०७/२०२६ |

टीप - अंतरिम गुणवत्ता यादी, ऑनलाईन तक्रार नोंदविणे, अंतिम गुणवत्ता यादी, उपलब्ध जागांची प्रसिध्दी, प्रवेश वाटप फेऱ्या, केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरी, महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी, संस्थास्तरीय प्रवेश प्रक्रिया व प्रवेश फेरी इत्यादी सर्व प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक NEET सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर प्रसिध्द करण्यात येईल.

प्रवेश प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती, पात्रता, आवश्यक कागदपत्रे, प्रवेश नियमावली, वेळापत्रक तसेच वेळोवेळी प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या सूचना www.mahacet.org या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येतील. उमेदवारांनी सदर संकेतस्थळास नियमित भेट देऊन अद्ययावत सूचनांचे पालन करावे.

**सही/-**
**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश**
**परीक्षा (सीईटी) कक्ष, मुंबई**